## नियमित दिवाणी दावा क्र.८०/२०२० मधील निशाणी ३० वरील आदेश

१. वादी यांनी हा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश १, नियम १० व आदेश ६, नियम १७ अन्वये प्रस्तावित प्रतिवादी क्र.१३ व १४ यांना दाव्यात प्रतिवादी म्हणून सामील करुन घेणेसाठी व त्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरूस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रस्तावित प्रतिवादी क्र.१३ व १४ यांना या अर्जाची नोटीस पाठविण्यात आली होती. परंतु, त्यांना त्या नोटीसीची बजावणी होवून देखील ते या कामी हजर झालेले नाहीत.

३. प्रतिवादी क्र.१, ३ ते ७ व ९ ते १२ यांनी अर्जावर म्हणणे दाखल करून अर्जास हरकत घेतली आहे.

४. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

५. वादी यांच्या अर्जातील कथनांप्रमाणे प्रस्तावित प्रतिवादी क्र.१३ व १४ हे प्रतिवादी क्र.१ ते १० यांच्या कुटूंबाच्या जमिनीचे खरेदीदार असल्यामुळे त्यांना प्रतिवादींचे कक्षेमध्ये घेणे आवश्यक आहे. वादी यांनी दावा दाखल करतेवेळी या प्रस्तावित प्रतिवादींबाबत प्लिडींग देखील केलेले आहे. परंतु, नजरचुकीने व अनावधानाने तसेच टंकलेखकाच्या चुकीमुळे प्रस्तावित प्रतिवादी यांना प्रतिवादींचे कक्षेमध्ये घेण्याचे राहून गेले आहे. सबब, अर्ज मंजूर करणेत यावा व प्रस्तावित प्रतिवादी क्र.१३ व १४ यांना या कामी प्रतिवादींचे कक्षेमध्ये सामील करून घेणेस वादी यांना परवानगी मिळावी, अशी विनंती वादी यांनी केली आहे. प्रतिवादी क्र.१, ३ ते ७ व ९ ते १२ यांनी अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, वादी यांनी अर्जाचे पुष्ट्यर्थ शपथपत्र सादर करून अर्जातील कथने शपथेवर कथन केली आहेत.

६. अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांनी त्यांचे दाव्यामध्ये प्रस्तावित प्रतिवादी क्र.१३ व १४ यांचेबाबत दाव्यात कथने केल्याचे स्पष्ट दिसून येते. वादी यांचे कथनांनुसार प्रस्तावित प्रतिवादी क्र.१३ व १४ हे प्रतिवादी

क्र.१ ते १० यांचे कुटूंबाच्या जमिनीचे खरेदीदार असल्याने या दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार आहेत. वादी यांनी हा दावा मालकी हक्क ठरवून मिळणेसाठी व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. प्रस्तावित प्रतिवादी क्र.१३ व १४ यांनी प्रतिवादी क्र.१ ते १० यांच्या कुटूंबाची जमीन खरेदी केली असल्याने या दाव्याचे चौकशी कामी ते आवश्यक पक्षकार आहेत. वादी हा दाव्याचा कर्ताकरविता असल्याने कोणाविरुध्द दावा करावयाचा, हे ठरविण्याचा हक्क वादी यांना आहे. प्रस्तावित प्रतिवादी क्र.१३ व १४ यांना या दाव्याचे कामी सामील करून घेतलेस त्यांना त्यांची बाजू मांडणेची संधी मिळणार असून या दाव्याचा गुणदोषांवर निकाल करणेस त्याची मदत होणार आहे. त्यामुळे, वादी यांचे मागणीनुसार त्यांना प्रस्तावित प्रतिवादी क्र.१३ व १४ यांना या दाव्याचे कामी प्रतिवादी म्हणून सामील करून घेणेस परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व उचित होईल. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः–

## आदेश

१. वादी यांचा निशाणी ३० वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादी यांनी अर्जात मागणी केलेप्रमाणे त्यांना प्रस्तावित प्रतिवादी क्र.१३ व १४ यांना या कामी प्रतिवादींचे कक्षेत सामील करुन घेणेस परवानगी देणेत येत आहे.

३. वादी यांनी आजपासून चौदा (१४) दिवसांच्या आत दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करावी व अभिलेखावर दाव्याची दुरूस्त प्रत सादर करावी.

–

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2022.11.30 12:26:26 +0530

**दिनांक : २४.११.२०२२** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाण : वडवणी** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वडवणी,**

**ता.वडवणी, जि.बीड.**

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol D. Mule)
Stenographer (Grade-3)
Civil Court Junior Division
Wadwani

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 24.11.2022 |
| Transcribed on | : | 24.11.2022 |
| Checked and signed on | : | 30.11.2022 |